दिनांक :- १५/०९/२०२४

**प्रेस नोट**

**पुणे पोलीस आयुक्तालय**

**गणेशोत्सव विसर्जन मिरवणुक २०२४ ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धकाच्या वापराबाबत..**

-----------oooo----------

गणेशोत्सव २०२४ अनुषंगाने दि.१७/०९/२०२४ व दि.१८/०९/२०२४ रोजीचे दरम्यान पुणे शहरात गणेश विसर्जन मिरवणुक सोहळा पार पडणार आहे. विसर्जन मिरवणुकीचे दरम्यान बऱ्याच मंडळांकडून ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक चा वापर केला जातो.

ध्वनी प्रदुषणाबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश व राष्ट्रीय हरित लवाद यांनी नियमावली दिली आहे.सदर आदेश व राष्ट्रीय हरित लवाद यांचे नियमावलींचे पालन करणेबाबत सर्व गणेश मंडळांना स्थानिक पोलीस स्टेशन स्तरावर सुचना दिलेल्या आहेत.

पुणे शहरातील सर्व गणेश मंडळांना गणेश विसर्जन मिरवणुक दरम्यान दिनांक १७/०९/२०२४ रोजी रात्री २४.०० वाजे पर्यत ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धकच्या वापरासाठी परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानंतर पुणे शहरातील कोणत्याही गणेश मंडळांनी ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धकचा वापर केल्यास सर्व संबधीतांवर कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

**( जी. श्रीधर )**
**पोलीस उप-आयुक्त,**
**विशेष शाखा, पुणे शहर.**